आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 01/03/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 71 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# महापालिकेचा 9 हजार 322 कोटींचा अर्थसंकल्प सादर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीचा कालावधी संपल्यानंतर लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकाचा 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा पहिलाच अर्थसंकल्प शनिवारी सादर करण्यात आला. मूळ अर्थसंकल्पाचा आकार 5 हजार 655 कोटी 73 लाख रुपये असून, केंद्र व राज्य शासनाच्या पुरस्कृत योजनांसह एकूण अर्थसंकल्प 9 हजार 322 कोटी 17 लाख रुपयांचा आहे. विशेष म्हणजे मालमत्ता कर व पाणीपट्टीत कोणतीही करवाढ किंवा दरवाढ करण्यात आलेली नाही.**



महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी नवनिर्वाचित स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्याकडे अर्थसंकल्प सादर केला. यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन तसेच स्थायी समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

अर्थसंकल्पात विविध विकासकामांसाठी 1 हजार 186 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. स्थापत्य विशेष योजनेसाठी 436 कोटी 94 लाख, महापौर निधीसाठी 50 कोटी, शहरी गरिबांसाठी 1 हजार 953 कोटी, महिलांच्या विविध योजनांसाठी 99 कोटी, अपंग कल्याणकारी योजनांसाठी 68 कोटी 30 लाख रुपये राखीव ठेवण्यात आले आहेत.

तसेच पाणीपुरवठा विषयक भांडवली कामांसाठी 155 कोटी 73 लाख, पीएमपीएमएलसाठी 400 कोटी, भूसंपादनासाठी 100 कोटी, अतिक्रमण निर्मूलनासाठी 10 कोटी, स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी 50 कोटी आणि अमृत योजनेसाठी 54 कोटी 45 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

महापालिकेकडे सर्वसाधारण निधी 1 हजार 455 कोटी तसेच इतर व राखीव निधीसह एकूण 5 हजार 690 कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. दुसरीकडे 559 कोटी 11 लाखांचे कर्ज असून, त्यामध्ये हरित कर्जरोखे 200 कोटी, महापालिका कर्जरोखे 200 कोटी आणि जागतिक बँकेचे 159 कोटी 11 लाख रुपयांचे कर्ज समाविष्ट आहे.

नवीन प्रशासकीय इमारत, पिंपरी येथील डेअरी फार्म रेल्वे उड्डाणपूल, मोशी रुग्णालय, थेरगाव येथील पीपीपी कर्करोग रुग्णालय, अग्निशमन प्रबोधिनी इमारत, प्रभाग क्र. 16 मधील मामुर्डी ते सांगवडे / हिंजवडी पुल बांधकाम प्रकल्प, ड्रेनेज मास्टर प्लॅन, पीसीएमसी सिटी सेंटर, अण्णासाहेब मगर स्टेडियम, हरित सेतू आणि टेल्को रोड – एनएमटी प्रकल्प, पाणीपुरवठा सुधारणा प्रकल्प (भामा आसखेड जॅकवेल – अमृत 2.0 अंतर्गत), प्रधानमंत्री आवास योजना (चऱ्होली, डुडुळगांव, बोऱ्हाडेवाडी, पिंपरी, आकुर्डी), अ प्रभागातील मदनलाला धिंग्रा मैदानात नवीन क्रीडा संकुल, वाकड येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे बॅडमिंटन कोर्ट, तळवडे येथील सर्व्हे नं. 1 गायरान जागेवर बायोडायव्हर्सिटी पार्क, विविध ठिकाणी वेस्ट टू वंडर (टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ) कलाकृती निर्मिती, मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, मोशी कचरा डेपो, मोशी कचरा डेपो येथील बायोगॅस प्रक्रिया प्रकल्प, सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्प, एकात्मिक घनकचरा प्रक्रिया प्रकल्प, जल ही अमृत उपक्रम, सामाजिक उपक्रम (सखी आंगण), प्राथमिक शिक्षण विभाग (जल्लोष शिक्षणाचा पर्व 3, शालेय साहित्य खरेदी, भारत दर्शन यात्रा, काला घोडा महोत्सवात सहभागी शाळांना बक्षिसे, सी लर्निंग अंतर्गत निवडक शिक्षक, पर्यवेक्षक व अधिकारी यांना प्रशिक्षणाकरिता लडाख येथे शैक्षणिक भेट).

# महिला भगिनींच्या समस्यांसाठी हा लाडका भाऊ त्यांच्या पाठीशी-महापौर

## समाज विकास विभाग आयोजित पवनाथडी जत्रेला महापौर रवि लांडगे यांची भेट

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पवनाथडी जत्रा ही महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी एक मोठे व्यासपीठ बनली आहे. महिलांना स्वतःच्या कौशल्यावर आधारित व्यवसाय उभारण्याची संधी येथे मिळत आहे. या जत्रेच्या माध्यमातून महिलांना थेट बाजारपेठ उपलब्ध होत असून त्यांच्या उत्पन्नात वाढ होत आहे. भविष्यात महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी अशा उपक्रमांमधून फायदा होईल, असे मत महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केले.**



पिंपरी चिंचवड महापालिका समाज विकास विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पवना थडी जत्रेला महापौर रवि लांडगे यांनी भेट दिली. या वेळी त्यांनी जत्रेतील सर्व स्टॉल्सना भेट देऊन विविध वस्तूंची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाने आयोजित या जत्रेमध्ये शहरातील विविध महिला बचत गटांनी सहभाग नोंदवला असून त्यांच्या उत्पादनांना नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. घरगुती पदार्थ, पारंपरिक खाद्यपदार्थ, लोणची, पापड, मिठाया, तसेच हस्तकला व सणासुदीच्या वस्तूंची विक्री मोठ्या प्रमाणावर होत आहे. या जत्रेचा मुख्य उद्देश महिलांना आर्थिक स्वावलंबनाकडे नेणे, त्यांच्यातील उद्योजकतेला चालना देणे आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. पवना थडी जत्रेमुळे महिलांना आपली उत्पादने नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची संधी मिळत असून आत्मविश्वासातही लक्षणीय वाढ होत आहे.

पवना थडी जत्रा ही केवळ खरेदी-विक्रीपुरती मर्यादित नसून महिलांच्या सर्वांगीण विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि समाज विकास विभागाच्या या उपक्रमामुळे शहरातील महिला उद्योजकतेला नवे बळ मिळत असून भविष्यातही अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी केली जाईल, असा विश्वास यावेळी महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केला. पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी पवना थडी जत्रेला भेट देऊन महिला उद्योजकांच्या उत्पादनांची खरेदी करावी. नागरिकांच्या पाठबळामुळे महिलांचे मनोबल वाढते आणि त्यांना पुढे जाण्याची प्रेरणा मिळेल, असे आवाहन महापौर लांडगे यांनी नागरिकांनाही केले.

यावेळी महापौर रवि लांडगे यांनी जत्रेतील महिला बचत गटांशी संवाद साधत त्यांच्या कष्टाचे आणि उद्योजकतेचे कौतुक केले. महिलांनी स्वहस्ते तयार केलेल्या खाद्यपदार्थांपासून ते हस्तकला, गृहउपयोगी वस्तू, सजावटीच्या साहित्यापर्यंत विविध उत्पादनांची रेलचेल पाहून महापौर रवि लांडगे यांनी समाधान व्यक्त केले तसेच शहरातील माझ्या भगिनींच्या समस्यांसाठी हा लाडका भाऊ त्यांच्या पाठीशी उभा राहील असेही ते म्हणाले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 01/03/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# थेरगावमध्ये अनधिकृत पार्किंगविरोधात कारवाई करा – विशाल बारणे

## ‘नो पार्किंग’ फलक लावण्याची मागणी

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव परिसरात सार्वजनिक रस्त्यांवर वाढत्या अनधिकृत पार्किंगविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवानेते विशाल नंदूशेठ बारणे यांनी कारवाईची मागणी केली आहे. सांगवी वाहतूक विभागाच्या पोलीस निरीक्षकांना निवेदन देत संबंधित वाहनधारकांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी तसेच ‘नो पार्किंग’चे फलक लावून ही समस्या कायमस्वरूपी सोडवावी, अशी मागणी त्यांनी केली.**



मोरू बारणे मैदान ते शंकर गावडे कामगार भवन तसेच अक्षय चंदन सोसायटीपासून बारणे कॉर्नर आणि बटरफ्लाय ब्रिजपर्यंतच्या सार्वजनिक रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात खासगी कार व बसचे अनधिकृत पार्किंग होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यामुळे वाहतूक कोंडी, अपघाताची शक्यता, पादचाऱ्यांना होणारी गैरसोय तसेच आपत्कालीन वाहनांना अडथळा निर्माण होण्यासारख्या गंभीर समस्या निर्माण होत असल्याचे बारणे यांनी स्पष्ट केले.

गेल्या काही दिवसांपासून ही समस्या तीव्र झाल्याने स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

त्यामुळे संबंधित परिसरातील वाहनधारकांवर कठोर कारवाई करून रस्ते मोकळे करावेत आणि कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून ‘नो पार्किंग’चे फलक तातडीने उभारावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या मागणीमुळे आता वाहतूक विभाग काय पावले उचलतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# सुलभा उबाळे यांची प्रशासनाला सकारात्मक साथ, पण ठोस अपेक्षा

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी : चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीचा कालावधी संपल्यानंतर लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकाचा 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा पहिलाच अर्थसंकल्प शनिवारी सादर करण्यात आला. मूळ अर्थसंकल्पाचा आकार 5 हजार 655 कोटी 73 लाख रुपये असून, केंद्र व राज्य शासनाच्या पुरस्कृत योजनांसह एकूण अर्थसंकल्प 9 हजार 322 कोटी 17 लाख रुपयांचा आहे. विशेष म्हणजे मालमत्ता कर व पाणीपट्टीत कोणतीही करवाढ किंवा दरवाढ करण्यात आलेली नाही.**



महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी नवनिर्वाचित स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्याकडे अर्थसंकल्प सादर केला.

अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे यांनी स्पष्ट केले की, “आजच्या अर्थसंकल्पावर आमचे कोणतेही प्रश्न नाहीत. मात्र आम्ही दिलेल्या सूचना, अधिसूचना आणि मागण्या प्रशासनाने गांभीर्याने घ्याव्यात, ही अपेक्षा आहे.”

त्या पुढे म्हणाल्या, “प्रशासनाने सादर केलेला अर्थसंकल्प आणि नागरिकांमधून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा अर्थसंकल्प यात फरक असतो. नागरिकांच्या समस्या आम्ही अधिक जवळून जाणतो. त्यामुळे आरोग्य, पाणीपुरवठा आणि जलनिसारण या मूलभूत प्रश्नांवर अधिक ठोस काम व्हावे.”

उबाळे यांनी शहरातील वाढत्या हॉकर्स झोनच्या समस्येकडे लक्ष वेधले. “मोठ्या प्रमाणात हॉकर्स झोनचा प्रश्न उपस्थित होत आहे. यामुळे नागरिकांना वाहतूक, स्वच्छता आणि सुरक्षेच्या समस्या भेडसावत आहेत. प्रशासनाने यावर ठोस मार्ग काढावा,” अशी मागणी त्यांनी केली.

महापालिकेचे दायित्व पार पाडण्याची क्षमता प्रशासनाकडे असल्याचे सांगत, “महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आम्ही नेहमी सहकार्य करू. विकासकामांसाठी आवश्यक निधी उभारण्यात आम्ही प्रशासनासोबत आहोत,” असे त्यांनी नमूद केले.

“आम्हाला चांगले काम करायचे आहे. ज्या प्रकारे आम्ही प्रशासनाला समजून घेतो, त्याचप्रमाणे प्रशासनानेही लोकप्रतिनिधींना समजून घ्यावे,” अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

**पत्रकारांसाठी ओळखपत्र व आचारसंहितेची मागणी**

शहरातील पत्रकारांची वाढती संख्या लक्षात घेता, पुणे महापालिकेच्या धर्तीवर पत्रकारांना अधिकृत ओळखपत्र (आयडेंटिटी कार्ड) देण्याची मागणीही उबाळे यांनी केली. पत्रकारांसाठी आचारसंहिता लागू करून त्यांना सन्मान मिळावा, चुकीच्या बातम्या प्रसारित होऊ नयेत आणि संवादाची प्रक्रिया सुदृढ व्हावी, यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सुचविले.

एकंदरीत सादर केलेला अर्थसंकल्प चांगला असून त्यावर कोणतीही हरकत नसल्याचे सांगत, आगामी काळात लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्या समन्वयातून शहराचा विकास साधला जाईल, असा विश्वास सुलभा उबाळे यांनी व्यक्त केला.

लोकप्रतिनिधींच्या पुनरागमनानंतरचा हा पहिलाच अर्थसंकल्प असल्याने प्रशासन आणि जनप्रतिनिधी यांच्यातील समन्वय कितपत प्रभावी ठरतो, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 01/03/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पुणे शहर भाजपा व्यापारी आघाडी अध्यक्षपदी श्री. महेश गुप्ता यांची नियुक्ती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : भारतीय जनता पक्षाच्या पुणे शहर व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी युवा, गतिमान आणि संघर्षशील नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या श्री. महेश गुप्ता यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे पुणे शहरातील व्यापारी वर्गामध्ये नव्या ऊर्जा, विश्वास आणि संघटनात्मक बळाची भावना निर्माण झाली आहे.**



या प्रसंगी भाजपा पुणे शहर अध्यक्ष श्री. धीरज घाटे, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस श्री. राजेश पांडे तसेच पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

श्री. महेश गुप्ता यांनी गेल्या अनेक वर्षांपासून व्यापारी वर्गाच्या प्रश्नांवर आक्रमक व परिणामकारक भूमिका घेतली आहे. शासन, महानगरपालिका, पोलीस प्रशासन तसेच विविध शासकीय विभागांमध्ये त्यांची ठोस उपस्थिती आणि प्रभावी समन्वय क्षमता ही त्यांची विशेष ओळख आहे. व्यापाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायकारक कारवायांविरोधात त्यांनी सातत्याने आवाज उठवला असून, समस्यांचे केवळ निवेदन नव्हे तर प्रत्यक्ष निकाल लावण्याची कार्यपद्धती त्यांनी निर्माण केली आहे.व्यवसाय सुलभतेसाठी (Ease of Doing Business) त्यांनी इन्कम टॅक्स, जीएसटी, परवाना प्रक्रिया, स्थानिक प्रशासनाशी संबंधित अडथळे तसेच अनावश्यक दंडात्मक कारवाई याबाबत ठोस पाठपुरावा केला आहे. बाजारपेठांमधील पायाभूत सुविधा, पार्किंग, सुरक्षा व्यवस्था आणि व्यापारी संरक्षण या विषयांवर त्यांनी सक्रिय नेतृत्व केले आहे.

भाजपा व्यापारी आघाडी ही केवळ संघटना नसून व्यापाऱ्यांच्या सन्मान, सुरक्षितता आणि हक्कांची लढाई लढणारे प्रभावी व्यासपीठ ठरेल, अशी स्पष्ट भूमिका श्री. महेश गुप्ता यांनी मांडली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पुणे शहरातील व्यापारी वर्ग अधिक संघटित, सशक्त आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी होईल, असा ठाम विश्वास व्यक्त केला जात आहे. पुणे शहरातील व्यापाऱ्यांसाठी धोरणात्मक, निर्णयक्षम आणि परिणामकारक नेतृत्व म्हणून श्री. महेश गुप्ता यांची नियुक्ती ही अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात आहे.

# भोसरीत रस्ता काँक्रिटीकरणाचे काम ठप्प

## प्रियांका बारसे यांची प्रशासनाला तातडीची सूचना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : शहरातील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडून भोसरी परिसरातील आदर्श शिक्षण संस्थेसमोरील काँक्रिटीकरणाचे काम गेल्या तीन महिन्यांपासून ठप्प पडले असून त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याबाबत माजी नगरसेविका प्रियांका प्रवीण बारसे यांनी संबंधित अभियंत्यांची भेट घेऊन तातडीने काम पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.**



सदर ठिकाणी शाळा सुरू असल्याने दररोज शेकडो विद्यार्थी, पालक आणि नागरिकांची ये-जा सुरू असते. मात्र रस्त्याच्या कामासाठी खोदण्यात आलेले खड्डे तसेच उघड्यावर टाकलेले मोठे पाईप यामुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. काही लहान मुले या पाईपवर उड्या मारताना दिसत असून कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने गंभीर दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

याशिवाय साईसिद्ध कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर पेव्हिंग ब्लॉक न बसवल्यामुळे नागरिकांना चिखल व धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून शाळा सुटण्याच्या वेळेस मोठी कोंडी निर्माण होते. तीन ते चार जेसीबी यंत्रे शाळेसमोरच पार्क करून ठेवण्यात आल्याने रस्ता आणखी अरुंद झाला आहे. त्यामुळे रुग्णवाहिका किंवा आपत्कालीन वाहनांना मार्ग काढणे कठीण होत आहे.

स्थानिक नागरिकांनीही या कामाच्या संथ गतीबाबत नाराजी व्यक्त केली आहे. काम सुरू करून ते अर्धवट सोडल्यामुळे परिसरातील व्यावसायिकांचेही नुकसान होत आहे. धुळीमुळे आरोग्याच्या तक्रारी वाढत असून ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना श्वसनाचा त्रास जाणवत आहे.

प्रियांका बारसे यांनी अभियंत्यांना कामाचा ठोस आराखडा जाहीर करून निश्चित कालमर्यादेत काम पूर्ण करण्याची मागणी केली. तसेच तात्पुरती सुरक्षा कुंपण, इशारा फलक, वाहतूक व्यवस्थापन आणि खड्डे तातडीने बुजवण्याचे निर्देश देण्याची मागणीही त्यांनी केली. कामात होत असलेल्या विलंबाबाबत जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अन्यथा नागरिकांसह आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित हा प्रश्न असल्याने महानगरपालिकेने तातडीने दखल घेऊन काम गतीमान करावे, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 01/03/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# प्रभाग क्र. 12 मधील पाणीपुरवठा सुरळीत करा-नगरसेविका शीतल वर्णेकर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड शहरातील प्रभाग क्रमांक 12 मधील नागरिकांना नियमित व वेळेवर पाणीपुरवठा मिळावा यासाठी नगरसेविका शीतल वर्णेकर यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे अधिकृत निवेदन सादर केले. महापौर रवी लांडगे तसेच अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांना हे निवेदन देण्यात आले.**

निवेदनात म्हंटले आहे कि, प्रभाग 12 मधील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा वेळेवर होत नसल्याच्या तसेच पाण्याचा दाब कमी असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने येत आहेत. यामुळे दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होत असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सदर समस्येची तात्काळ दखल घेऊन प्रभागात नियमित, पुरेसा व निश्चित वेळेनुसार पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



# महापालिकेतील 'बोगस व दुरस्त शिक्षणाद्वारे पदोन्नती' करणाची राज्य शासनाकडून चौकशी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्या आणि बोगस व दुरस्त शिक्षणाचा (Distance Education) आधार घेऊन नियमबाह्य पद्धतीने पदोन्नती मिळवल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत राज्य शासनाने चौकशी समिती गठीत केली असून, महापालिकेला पुढील तीन महिन्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.**



## आमदार अमित गोरखे यांच्या प्रश्नानंतर समिती गठीत

विधानपरिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी तारांकित प्रश्नाद्वारे हा मुद्दा उपस्थित केला. महापालिकेच्या विविध विभागांत अनेक कर्मचाऱ्यांनी युजीसीच्या (UGC) निकषांचे उल्लंघन करून मिळवलेल्या पदव्यांच्या आधारे वरिष्ठ पदे लाटल्याचा आरोप त्यांनी केला. यामुळे पात्र आणि प्रामाणिक कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

परराज्यातील पदव्या: अनेक कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठांतून घेतलेल्या पदव्यांची वैधता संशयास्पद आहे.

दुरस्त शिक्षण : काही तांत्रिक पदांसाठी दुरस्त शिक्षणाद्वारे घेतलेल्या पदव्या ग्राह्य नसतानाही त्या पदोन्नतीसाठी वापरल्या गेल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

नियमबाह्य पदोन्नती: सेवा प्रवेश नियमावलीला बगल देऊन या पदोन्नत्या कशा देण्यात आल्या, याची सखोल चौकशी ही समिती करणार आहे.

आमदार अमित गोरखे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली. पदोन्नती प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे हे शासनाचे प्राधान्य आहे. या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली असून, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने या संपूर्ण प्रकरणाचा तपास करून येत्या 90 दिवसांच्या (3 महिने) आत आपला अंतिम अहवाल राज्य शासनाकडे सुपूर्द करावा, असे कडक आदेश त्यांनी दिले आहेत. शासनामार्फत या अहवालाची कसून तपासणी करून पुढील कार्यवाही निश्चित केली जाईल.

या चर्चेत विधानपरिषदेचे ज्येष्ठ नेते माननीय आमदार प्रवीण दरेकर यांनी देखील सहभाग नोंदवला. त्यांनी या विषयाची व्याप्ती लक्षात घेता, केवळ एका महापालिकेपर्यंत मर्यादित न राहता राज्यस्तरावरील इतर महानगरपालिकांमध्येही अशाच प्रकारे नियमबाह्य पदोन्नती मिळवल्या जाण्याची शक्यता उपस्थित केली. भविष्यात अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी महापालिका प्रशासनाने 'प्रतिबंधात्मक उपाययोजना' राबवणे अत्यंत आवश्यक आहे, असा महत्वाचा मुद्दा त्यांनी मांडला. त्यांच्या या सूचनेमुळे या प्रकरणाला आता धोरणात्मक स्वरूप प्राप्त झाले आहे.

> “महानगरपालिकेच्या प्रशासनात पारदर्शकता असणे आवश्यक आहे. नियमबाह्य मार्गाने पदोन्नती मिळवून पात्र उमेदवारांची संधी हिरावणे चुकीचे आहे. या चौकशीतून सत्य समोर येईल आणि दोषींवर कडक कारवाई होईल, असा मला विश्वास आहे.”
>
> **आमदार अमित गोरखे**

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 01/03/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरी चिंचवडमध्ये 3 ते 5 मार्चदरम्यान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी आणि गाथा फिल्म सोसायटी यांच्या वतीने तसेच सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, गोरेगाव (पूर्व), मुंबई, भारतीय चित्रपट व दूरचित्रवाणी संस्था, पुणे (एफटीआयआय) यांच्या सहकार्याने आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर सभागृह येथे 3 ते 5 मार्च 2026 या कालावधीत पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या जागतिक दर्जाच्या चित्रपट महोत्सवास शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.**




पिंपरी चिंचवड शहरात आयोजित करण्यात येत असलेला हा महोत्सव एक भव्य, वैविध्यपूर्ण आणि आशयघन सांस्कृतिक सोहळा ठरणार असून यंदाच्या महोत्सवात तब्बल 43 देशांमधील 116 चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. जागतिक स्तरावरील दर्जेदार कलाकृतींचा आस्वाद शहरातील चित्रपटप्रेमींना या महोत्सवाच्या माध्यमातून घेता येणार असून हा महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला ठेवण्यात आला आहे.

**महोत्सवात भारतासह अमेरिका, युनायटेड** किंगडम, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, स्वित्झर्लंड, नेदरलँड्स, पोलंड, स्वीडन, सायप्रस, इटली, ट्युनिशिया, इजिप्त, मोरोक्को, लेबनॉन, पॅलेस्टाईन, चिली, ब्राझील, जपान, थायलंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, रशिया, दक्षिण कोरिया, अर्जेंटिना, मेक्सिको, तुर्की, इराण, दक्षिण आफ्रिका आणि ग्रीस आदी देशांचा सहभाग आहे. विविध खंडांतील देशांमधून आलेल्या चित्रपटांमुळे महोत्सवाला खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे.

या महोत्सवात लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन चित्रपट तसेच दीर्घपट अशा विविध प्रकारच्या चित्रपटांचा समावेश असून सर्व वयोगटातील प्रेक्षकांना लक्षात घेऊन चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक चित्रपटातून समाजमनाला स्पर्श करणारे आणि विचारप्रवर्तक विषय प्रभावीपणे मांडण्यात आले आहेत.

महोत्सवात सादर होणाऱ्या चित्रपटांमधून विज्ञान आणि अंधश्रद्धा, रुढीपरंपरा, समाजव्यवस्था, निसर्ग व पर्यावरण, तंत्रज्ञान, प्रेम व मानवी भावना, महापूर व आपत्ती व्यवस्थापन तसेच महापुरुषांच्या जीवनावर आधारित असे विविध विषय मांडण्यात आले आहेत. याशिवाय शिक्षण व ज्ञानप्रबोधन, महिला सक्षमीकरण व लैंगिक समानता, युवा नेतृत्व विकास, ग्रामीण विकास व शाश्वत प्रगती, सामाजिक समता व मानवाधिकार, आरोग्य व मानसिक स्वास्थ्य जनजागृती, बालहक्क, कला व लोकसंस्कृती संवर्धन, उद्योजकता व नवकल्पना, जागतिक शांतता, दिव्यांग सक्षमीकरण, क्रीडा प्रेरणा, हवामान बदल जनजागृती आणि कुटुंब व्यवस्थेतील मूल्ये अशा सकारात्मक व समाजाभिमुख विषयांचाही देखील समावेश आहे.

चित्रपट क्षेत्रात महिलांना अधिक संधी आणि व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने महोत्सवात 'सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक' हा विशेष पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. महिला दिग्दर्शकांच्या सर्जनशीलतेचा गौरव करण्याचा हा उपक्रम विशेष लक्षवेधी ठरणार आहे. याशिवाय, 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 2026' हा शहराच्या सांस्कृतिक समृद्धीत भर घालणारा आणि नव्या विचारांना चालना देणारा उपक्रम ठरणार आहे.

**5 मार्च रोजी संपन्न होणार पारितोषिक वितरण समारंभ**

पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 2026 अंतर्गत बुधवार, दि. 5 मार्च 2026 रोजी चित्रपट महोत्सवातील विविध स्पर्धा विभागांतील उत्कृष्ट चित्रपटांना सन्मानित करून पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. महोत्सवादरम्यान प्रदर्शित करण्यात आलेल्या लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन चित्रपट तसेच दीर्घपट या विविध गटांमधील निवडक कलाकृतींना सन्मानित करण्यात येणार असून 'सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक' या विशेष पुरस्काराचाही यावेळी प्रदान करण्यात येणार आहे. या समारंभास चित्रपटसृष्टीतील मान्यवर, परीक्षक तसेच सहभागी दिग्दर्शक व निर्माते उपस्थित राहणार आहेत.

**महोत्सवात 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपटाचे विशेष प्रदर्शन**

'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' या मराठी चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 2026' मध्ये ग. दि. माडगूळकर सभागृह येथे 5 मार्च रोजी दुपारी 3 वाजता आयोजित करण्यात आले आहे. मराठी माध्यमातील शिक्षणव्यवस्था, बदलते सामाजिक वास्तव आणि स्थानिक भाषेतील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले जाणार आहे. मराठी भाषा, शिक्षण आणि सांस्कृतिक ओळख यांचा परस्परसंबंध प्रभावीपणे उलगडणारा हा चित्रपट महोत्सवातील विशेष आकर्षण ठरणार असून चित्रपटप्रेमींना मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनाच्या दृष्टीने चिंतन करण्याची संधी उपलब्ध करून देणार आहे.



"पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 2026' हा आपल्या शहराच्या सांस्कृतिक समृद्धीला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. तब्बल 43 देशांतील 116 दर्जेदार चित्रपटांच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय आणि मानवी मूल्यांवर आधारित आशयपूर्ण कलाकृती नागरिकांना पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून नव्या विचारांना दिशा मिळेल, तसेच विशेषतः महिला दिग्दर्शकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न निश्चितच प्रेरणादायी ठरेल. शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या विनामूल्य महोत्सवाचा लाभ घ्यावा."

**रवि लांडगे,** महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका